# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

**मिरा भाईंदर महापालिका मुख्यालय पासून सगळ्या प्रभाग समिती कार्यालयात मान्सून पूर्व डीप क्लीन ड्राईव्हची यशस्वी मोहिम**

स्वच्छ भारत अभियान आणि राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात "मान्सूनपूर्व डीप क्लिन ड्राईव्ह" ही विशेष स्वच्छता मोहीम मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या राबविण्यात आली.

सकाळी ९ वाजता मनपा अधिकारी व कर्मचारी यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयसह आपल्या प्रभाग कार्यालयात एकत्र जमून कर्मचाऱ्यांनी सामूहिक स्वच्छता शपथ घेतली. त्यानंतर प्रत्येक टीमने आप-आपल्या प्रभाग क्षेत्रातील अंतर्गत कार्यालय व बाहेरील परिसराची मान्सूनपूर्व स्वच्छता केली सदर "मान्सूनपूर्व डीप क्लीन ड्राईव्ह" मोहिमेमध्ये मिरा भाईंदर मुख्य कार्यालयसह प्रभाग समिती क्र. १ ते ६ मधील सगळ्या कार्यालयात दरम्यान स्वच्छता मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली.

ही मोहीम केवळ महापालिकेची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची आहे. म्हणूनच मिरा भाईंदर महापालिकेच्या वतीने मा. आयुक्त राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, जसे मनपा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रत्येक प्रभागातील कार्यालय मान्सून पूर्व स्वच्छ केले त्याचप्रमाणे तुम्ही देखील आपल्या सोसायटी, कार्यालय, शाळा, महाविद्यालय आणि परिसराची जबाबदारी स्वीकारून मान्सूनपूर्व स्वच्छता करून या मोहिमेत सक्रिय सहभागी व्हावे. तसेच "स्वच्छ मिरा भाईंदर, सुंदर मिरा भाईंदर" या ध्येयाने प्रेरित होऊन आपण सर्वांनीच स्वच्छतेच्या मोहिमेत एकत्र यावे, असे आवाहन मा. आयुक्तांनी नागरिकांना केले. या मोहिमेच्या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त प्रसाद शिंगटे,अग्निशमन दल अधिकारी, सर्व सहाय्यक आयुक्त, स्वच्छता निरीक्षक , अधिकारी व सफाई कर्मचारी उपस्थित होते.